**अर्ज करण्याचा अंतिम दिनांक १६/०३ /२००९**

# विभागीय निवड समिती , विभागीय आयुक्त कार्यालय,नाशिक.

**जाहिरात क्रमांक मशा/कार्या१/आस्था १ / पदभरती/ ७०८१/२००९ दिनांक ०२/०२/२००९**

नाशिक विभागाअंतर्गत विभागीय आयुक्त कार्यालय / जिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी यांचे आस्थपनेवरील **मराठी लघुलेखक (निम्नश्रेणी )** पदांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

**१ . अ) पदाचे नांव :- मराठी लघुलेखक (निम्नश्रेणी ) (रिक्त पदांची संख्या : ०७)**

**वरील ७ पदांपैकी समांतर आरक्षणाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

| प्रवर्ग | भरावयाची एकूण पदे | समांतर आरक्षणाचा प्रकार | | |
|---|---|---|---|---|
| | | महिला राखीव | माजी सैनिक | स.आ.व्य. इतर |
| अनु.जाती | १ | ० | ० | १ |
| वि.जा. (अ) | १ | ० | ० | १ |
| भ.ज. (ब) | १ | ० | १ | ० |
| इ.मा.व. | २ | १ | ० | १ |
| खुले | २ | १ | ० | १ |
| एकूण | ७ | २ | १ | ४ |

टिपः- (१) वि.जा. ( अ) व भ.ज. ( ब) अंतर्गत परिवर्तनिय आहे. वि.जा. (अ) , भ.ज. (ब) मधील उमेदवार उपलब्ध न झाल्यास भ.ज. (क), भ.ज. (ड) प्रवर्गातील उमेदवारांचा विचार करण्यात येईल.

(२) महीला, माजी सैनिक यातून उमेदवार न मिळाल्यास त्या त्या प्रवर्गातील इतर उमेदवारातून पदे भरण्यात येतील.

**ब)** वेतनश्रेणीः**- रु ५५००-१७५-९०००**

क) **शैक्षणिक अर्हता** : (१) माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण. (२) **मराठी लघुलेखन** वेग किमान १०० शब्द प्रति मिनिट व **मराठी टंकलेखन** वेग किमान ३० शब्द प्रती मिनिट उत्तीर्ण असल्याचे शासकिय वाणिज्य मंडळाचे प्रमाापत्र (इंग्रजी लघुलेखन वेग किमान १०० श.प्र.मि. व टंकलेखन किमान ४० श.प्र.मि. उत्तीर्ण असल्याचे शासनकिय वाणिज्य मंडळाचे प्रमाणपत्र असणे ही अतिरिक्त पात्रता मानण्यात येईल. )

(३) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग , शासन निर्णय क्रमांक प्राधिकरण २००० / प्र क्र ६१/२००१ /३९ दिनांक १९ मार्च २००३ अन्वये महाराट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT किंवा DOEACC सोसायटीच्या अधिकृत 'CCC' / 'O'/ 'A' / 'B'/ 'C' स्तर संगणक परीक्षा नियुक्तीचे दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण होणे आवश्यक अन्यथा उमेदवाराच्या सेवा समाप्त होतील.

**ड) वयोमर्यादाः** दि. १६/०३/२००९ रोजी १८ वर्षापेक्षा कमी नाही व ३३ वर्षापेक्षा जास्त नाही **(मागासवर्गीय उमेदवारांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम ) माजी सैनिक उमेदवारांसाठी शासन निर्णयातील तरतुदीनुसार वयाची अट राहिल.**

इ) नियमानुसार उन्नत व प्रगत गटाचे तत्व लागू राहिल.

फ) सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र एसआरव्ही - २००/प्रक्र१७ / २०००/ बारा दिनांक २८/३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही - २०००/प्र क्र १७/२००० / बारा दिनांक १/७/२००५ नुसार लहान कुटुंब असल्याचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. अविवाहीत असणा-या अर्जदारांनी नमुन्यातील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

## (२) इतर अटी

१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा. अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याचे स्वाक्षरीचे अधिवास (Domicile) प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

२) विहीत वयोमर्यादेतील इच्छूक शासकिय / निमशासकिय कर्मचा-याने त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या परवानगीने भरावेत व अशा परवानगीची प्रत अर्जासोबत जोडावी.

३) जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वतंत्रपणे रितसर अर्ज करणे आवश्यक आहे.

**वरील प्रमाणे अर्हता धारण करीत नसलेल्या तसेच वयोमर्यादेत बसत नसलेल्या उमेदवारांनी अर्ज करुनयेत ,त्यांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही,तसेच त्यांचेशी पत्रव्यवहार केला जाणार नाही.**

**३. अर्जाचा नमुना ए- ४ पेपर साईज मध्ये जाहिरातीसोबत दिला आहे त्याप्रमाणे संगणकीकृत/ टंकलिखीत करुन अर्ज करावा. सदरची जाहिरात अर्जाचा नमुना विभागीय आयुक्त नाशिक विभाग यांचे खालील संकेतस्थळावर उपलब्ध केला आहे.**

www.nashik.nic.in/divisionalcommissioner/htmldocs/index.html.

- **अर्ज करण्याची अंतिम तारीख १६ /०३ /२००९ आहे.**
- भविष्यात वरील पदांच्या संख्येत कमी-अधिक बदल होवू शकतो, त्याप्रमाणे आरक्षित पदाची संख्या स्थिती राहील.

**अध्यक्ष**
**विभागीय निवड समिती,तथा**
**विभागीय आयुक्त नाशिक विभाग,नाशिक**

## अ) पदांच्या निवडीसाठी कार्यपध्दती

शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील निर्णय दिनांक १९/१०/२००७ नुसार पदे भरतांना उमेदवाराची निवड खाली नमुद केल्याप्रमाणे लेखी परीक्षा,व्यावसायिक चाचणी व तोंडी परीक्षा घेऊन करण्यात येईल.

**लेखी व तोंडी परीक्षा घेण्याबाबत**

मराठी लघूलेखक (निम्नश्रेणी) या पदासाठी व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक असल्याने या पदासाठी ५० % गुणांची लेखी परीक्षा, ४० % गुणांची व्यावसायिक चाचणी व मुलाखतीसाठी १० % इतके गुण ठेवून उमेदवारांची निवड करण्यात येईल. परीक्षा पध्दतीबद्दल तपशीलवार सूचना उमेदवारांना सूचनापत्रासोबत देण्यात येतील.

१)लेखी परीक्षा: -लेखी परीक्षेसाठी मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व अंकगणित या विषयांवरील प्रश्नांकरिता प्रत्येकी २५ गुण ठेवून १०० गुणांची लेखी परीक्षा घेण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहूपर्यायी स्वरुपाच्या असतील.

लेखी परिक्षा दिलेल्या उमेदवारांपैकी गुणानुक्रमे १ : १० या प्रमाणात प्रवर्ग निहाय उमेदवारांना व्यावसायीक चाचणीसाठी बोलाविण्यात येईल

२) व्यावसायीक चाचणी :- ८० गुणांची व्यावसायीक चाचणी घेण्यात येईल. त्यात मराठी लघुलेखन १०० श.प्र.मि. व मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. ची परीक्षा घेण्यात येईल. मराठी टंक लेखनाची चाचणी संगणकावर ISM आज्ञावलीतील मराठी फॉन्ट वापरून दयावी लागेल.

व्यावसायीक चाचणी दिलेल्या उमेदवारांपैकी गुणानुक्रमे १ : ३ या प्रमाणात प्रवर्ग निहाय उमेदवारांना मुलाखतीसाठी बोलाविण्यात येईल.

३) मुलाखत :- मुलाखतीस २० गुण ठेवण्यात आलेले आहेत. (एखादा उमेदवार लेखी परीक्षेत अधिक गुण मिळवून देखील मुलाखतीस गैरहजर राहिल्यास त्याची नियुक्तीसाठी शिफारस करण्यात येणार नाही. )

गुणवत्ता यादीतील मुलाखतीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी त्यांचे शैक्षणिक पात्रतेचे सर्व मुळ प्रमाणपत्रे मुलाखतीच्या वेळेस हजर करणे आवश्यक राहील.

**अर्जासोबत शुल्क (फी) आकारण्याबाबत :-**

उमेदवारांकडून अर्जासोबत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क महाराष्ट्र राज्याचे न्यायालयीन फी मुद्रांकाच्या स्वरुपात (कोर्ट फी स्टॅम्प) आकारण्यात येइल. योग्य किंमतीचा मुंद्राक उमेदवाराने अर्जावरच घट्ट चिटकवावा.

| अ.नं | तपशील | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | परीक्षा शुल्क | रु.२००/- | रु.१००/- |
| २ | माजी सैनिकांना अर्जासोबत आवेदन शुल्क भरण्याची अट लागू नाही | | |
| ३ | क्वचित प्रसंगी अर्जदारास कोर्ट फी स्टॅम्प मिळविणे शक्य नसेल तर त्याबाबतीत विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांच्या नावाने काढलेले रेखांकित भारतीय पोस्टल ऑर्डरद्वारे आवेदन शुल्क स्वीकारण्यात येईल. | | |

## ब) अटी व शर्ती :-

(१) खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. व तसेच, मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागास वर्ग,विमुक्त जाती (अ),भटक्या जमाती(ब), भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील

महिला सदस्यांना महिलांचे ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. त्यांनी क्रिमीलेअरमध्ये मोडत नसल्याचे प्रमाणपत्र मुलाखतीच्या वेळेस हजर करणे आवश्यक राहील.

(२) उमेदवार ज्या राखीव जाती प्रवर्गाच्या पदांसाठी अर्ज करीत असेल त्या जातीप्रवर्गाच्या जातीचे प्रमाणपत्र व असल्यास जातीवैधता प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे. उमेदवाराने नियुक्ती झाल्यानंतर जातीप्रमाणपत्राची वैधता सहा महिन्यात सादर करणे आवश्यक राहील.

(३) उमेदवारांनी लहान कुटुबांचे प्रतिज्ञापत्राच्या नमुना-अ मध्ये प्रतिज्ञापत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

(४) उमेदवाराने अर्जासोबत शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे माध्यमिक शालांत परीक्षा,शाळा सोडल्याचा दाखला, जातीचा दाखला , अधिवास प्रमाणपत्र (Domicile) , लघूलेखन परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र, संगंणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक प्रमाणपत्रांच्या व गुणपत्रकांच्या **छायांकित प्रती साक्षांकित करुन जोडाव्यात.सांक्षांकन हे केंद्र / राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी / पोस्ट मास्तर , मुख्याधापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिका-यानीच केलेले प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.**

**५) आरक्षण अधिनियम २००१ मधील कलम ४ पोट कलम २ च्या परंतुकांन्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमिलेअरचे ) तत्व अनुसुचित जाती व अनूसूचित जमाती व्यतिरिक्त निरधिसुचित जाती (विमुक्त जाती-अ ),भटक्या जमाती ब ,क ,ड त्याचबरोबर इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग या मागास वर्गांना लागु करण्यात आलेले आहे.**

## क) अर्ज करावयाची पध्दत :-

(१) उमेदवारांनी जाहिरातीत दिलेल्या नमुन्याबरहुकूम **सदस्य सचिव, विभागीय निवड समिती, विभागीय आयुक्त कार्यालय, नविन प्रशासकीय इमारत, नाशिकरोड, नाशिक , ४२२१०१** या पत्त्यावर दिलेल्या अंतिम तारखेच्या आत पोहचतील या बेताने डाकेने अथवा समक्ष पाठवावा. **लिफाफ्यावर मराठी लघुलेखक (निम्नश्रेणी ) पदासाठी अर्ज असे ठळक अक्षरात नमुद करण्यात यावे.** मात्र अंतिम तारखेच्या नंतर डाकेने प्राप्त होणारे तसेच समक्ष आणुन जमा केलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची अर्ज करणा-या उमेदवारांने नोंद घ्यावी. समक्ष अर्ज सादर करण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या महसूल शाखेत संपर्क साधावा.

**ड) विशेष सूचना :-**

(१) उमेदवारांने त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यांची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

(२) अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीसाठी बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

(३) उमेदवारांना लेखी परिक्षा , व्यावसायीक चाचणीसाठी , मुलाखतीसाठी परिक्षाकेंद्रावर स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल.

(४) उमेदवाराने अलीकडील पासपोर्ट साईज फोटो अर्जावर विहित जागी घट्ट चिकटवावा व त्यावर स्वाक्षरी करावी.

(५) अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक १६ /०३ /२००९ रोजी कार्यालयीन वेळेप्रमाणे सायंकाळी ५:४५ वाजेपावेतो राहील. या तारखेनंतर व वेळेनंतर प्राप्त होणारे अर्जाचा विचार केला जाणार नाही. टपाल सेवेच्या दिरंगाईस / विलंबास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. हयाची नोंद घ्यावी.

(६) निवडप्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल.

(७) रिक्त पदांच्या संख्येत कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे.तसेच काही अपरीहार्य कारणाने परिक्षा स्थगित झाल्यास त्याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परिक्षेचा प्रकार, पदांची संख्या , समांतर आरक्षण व सामाजिक आरक्षण याबाबत बदल करणे, परिक्षा स्थगित करणे व रद्द करणे , अंशतः बदल करणे तसेच भरती प्रक्रियेत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, विभागीय निवड समिती, तथा विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक स्वतः कडे राखुन ठेवत आहेत.भरतीप्रक्रीये संदर्भात उद्‌भवणारे वाद, तक्रारी इ. बाबत सदर समितीचा निर्णय अंतिम राहील.

(८) सदरची पदे अस्थायी स्वरूपाची असून शासनाच्या धोरणाअंती उमेदवाराची सेवा एक महिन्याची नोटीस देऊन केंव्हाही समाप्त करण्यात येईल.

(९) या जाहिरातीसंबंधी कोणतेही न्यायालयीन प्रकरण नाशिक न्यायालयीन मुख्यलयाचे अंमलाखाली राहील.

(१०) अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नाशिक विभागातील नाशिक, धुळे, नंदूरबार, जळगाव, अहमदनगर यापैकी कोणत्याही जिल्हयात नियुक्ती देण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराना त्यांचे नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसाचे आत आदेशीत कार्यालयातील पदावर रुजू व्हावे लागेल अन्यथा त्यांची नियुक्ती

आपोआप रद्द हाईल. तसेच निवडसूचीतून प्रतिक्षायादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल. नियुक्तीच्या ठिकाणी उमेदवारांना स्वखर्चाने जाऊन रुजू होणे अनिवार्य आहे.

**अध्यक्ष**
**विभागीय निवड समिती**
**तथा**
**विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक**

# मराठी लघुलेखक ( निम्न श्रेणी ) पदासाठी अर्ज.

| स्वतः च्या स्वाक्षरीसह पासपोर्ट आकाराचा अलीकडचा फोटो |
|---|

प्रति,
मा. सदस्य सचिव ,
विभागीय निवड समिती,
विभागीय आयुक्त कार्यालय,
नवीन प्रशासकीय इमारत,नाशिकरोड, नाशिक ४२२ १०१.

महोदय,

मी ------------------------------- पदासाठी अर्ज करीत असुन माझा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) संपुर्ण नांव आडनांव स्वतःचे नांव वडीलांचे / पतीचे नाव

:- --------------------------------------------------

२) पत्रव्यवहाराचा पत्ता (पिनकोडसह) :- --------------------------------------------------
--

--------------------------------------------------
--

३) स्त्री / पुरुष :-

४) राष्ट्रीयत्व :-

५) जन्म तारीख (अंकी) :-

(अक्षरात) :-

६) दिनांक १६/३/२००९ रोजी वय :- वर्ष ------------ महिने ------------ दिवस ------
-

७) जात / पोट जात :-

जात प्रवर्ग :- अर्जदार खालील पैकी कोणत्या प्रवर्गात मोडतो. त्याचे खाली ( ✓ ) खुण करावी.

| अ.जा. | अ.ज | विजा.(अ) | भ.ज.(ब) | भ.ज.(क) | भ.ज.(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| S.C. | S.T. | D.T.(A) | N.T.(B) | N.T.(C) | N.T.(D) | S.B.C | O.B.C | OPEN |
| | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :-

| **शैक्षणिक अर्हता** | **परिक्षा मंडळाचे नांव** | **उत्तीर्ण वर्ष** | **एकुण गुण** | **मिळालेले गुण** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|---|---|
| माध्यमिक शालांत परिक्षा | | | | | |
| | | | | | |

९) शासकीय वाणिज्य मंडळाच्या परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचा तपशील :-

| **परीक्षा** | **वेग (शब्द प्रति मिनीट)** | **उत्तीर्ण वर्ष** | **श्रेणी** |
|---|---|---|---|
| मराठी लघुलेखन (अनिवार्य) | | | |

| | | | |
|---|---|---|---|
| मराठी टंकलेखन (अनिवार्य) | | | |
| इंग्रजी लघुलेखन (ऐच्छिक) | | | |
| इंग्रजी टंकलेखन (ऐच्छिक) | | | |



१०) संगणक अर्हता

| संगणक अर्हता | उत्तीर्ण वर्ष | श्रेणी |
|---|---|---|
| MSCIT | | |
| D.O.E.A.C.C./C.C.C. किंवा O किंवा A किंवा C स्तर | | |

११) महाराष्ट्राचा मुळ रहीवासी आहे काय ? :- होय / नाही

१२) अर्जदार स्वत: माजी सैनिक आहे काय ? :- होय / नाही

१३) अर्जदार स्वातंत्र्य सैनिक /त्यांचे नामनिर्देशित आहे काय ? :- होय / नाही

१४) अर्जदार संपकालीन कर्मचारी आहे काय ? :- होय / नाही

१५) अर्जदार जनगणना कर्मचारी आहे कार्य ? :- होय / नाही

१६) अर्जदार अंशकालीन कर्मचारी आहे काय ? :- होय / नाही

१७) उन्नत प्रगत गटात नसल्यास उमेदवारांनी दि.१/४/२००८ नंतरचे प्रमाणपत्र जोडले आहे काय ? :- होय / नाही

१८) उमेदवारा बद्दल न्यायप्रविष्ठ प्रकरण फौजदारी, शिस्तभंग विषयक व तत्सम इतर कार्यवाही चालू आहे काय ? :- होय / नाही

१९) सेवायोजन कार्यालय / समाज कल्याण कार्यालय/ आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालय यांचेकडेस नांव नोंदणी केली आहे काय ? (असल्यास नोंदणी पत्राची प्रत जोडावी.) :- होय / नाही

ठिकाण :-

नोंदणी क्र. :-

दिनांक :-

मी शपथ पुर्वक प्रमाणित करतो /करते की, उपरोक्त माहिती खरी असुन मुलाखतीच्या वेळेस पळताडणीसाठी मुळ प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक असल्याची मला जाणीव आहे. तसेच भविष्यात वरील माहितीत कोणतीही चुक आढळल्यास अथवा खोटी असल्याचे आढळून आल्यास मला कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरविले जाण्यास तसेच फौजदारी कार्यवाहीस मी पात्र राहील. याची मला जाणीव आहे.

स्थळ :-

दिनांक :- / /२००९

**अर्जदाराची सही**

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना.

प्रतिज्ञापत्र- नमुना - अ. (नियम ४ पहा)

मी श्री ---------------------------------------------- श्री. ----------------------------------

यांचा मुलगा वय वर्षे राहणार ---------------------------------------------------------

याद्वारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो की,

१) मी --------------------------------------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------------------------------------- (संख्या) इतकी हयात अपत्य आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च, २००६ यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांची संख्या --------------------------- आहे. `.

(असल्यास, जन्मदिनांक नमुद करावा.)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च,२००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :-

दिनांक / /२००९ **उमेदवाराची स्वाक्षरी**